जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
सामान्य प्रशासन विभाग
आवक क्रमांक-
12 OCT 2010
विभाग-
क.अ./उप मु.का.अ./अति. मु.का.अ./मु.का.अ.

**आदिवासी भागातील पाडा स्वयंसेवकांची**
**पदे मृत - संवर्ग म्हणून घोषित करणेबाबत**

जि.प.(सिंधुदुर्ग), आरोग्य विभाग
आवक कार्यासन............
16 OCT 2010
अधिक्षक /क. अ.
अति. जि.आ.आ.
जि.आ.आ.

## महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्र.पुपास्व-२००८/प्र.क्र.१२६/कु.क.-१**
**दि. १३.०८.२०१०**

**वाचा :** शासन निर्णय क्र.हिनिका-२००३/प्र.क्र.१३१/आरोग्य ६, दि.२३.०५.२००३

**प्रस्तावना :** दूर्गम आदिवासी भागात पावसाळयामध्ये अनेक साथीच्या रोगांचा प्रादूर्भाव नेहमीच होत असतो. त्याचप्रमाणे कुपोषण आणि बालमृत्युचे प्रमाण देखील जास्त असते. यावर उपाययोजना म्हणून या भागात आरोग्य सेवांची माहिती देणे, साथीच्या रोगांची माहिती देणे व स्वच्छतेचे महत्त्व स्थानिक लोकांना सांगणे इ. कामे करण्यासाठी पाडा स्वयंसेवकांची नेमणूक सन १९९६-९७ पासून करण्यात आली आहे. या पाडा स्वयंसेवकांना हंगामी स्वरुपाचे काम असते. भारत सरकारच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानंतर्गत सन २००६-०७ पासून ग्रामीण व विशेषतः आदिवासी क्षेत्रात प्रत्येक गावात स्थानिक आरोग्य कार्यकर्ती म्हणून "आशा" कार्यकर्तीची नेमणूक केली आहे. पाडा स्वयंसेवक जी कामे करीत आहेत त्यापैकी बहुतंःशी सर्व कामे "आशा" कार्यकर्तीकडून करण्यात येतात, म्हणून पाडा स्वयंसेवकांची पदे मृत - संवर्ग (Dying Cadre) म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :** भारत सरकारच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानंतर्गत सन २००६-०७ पासून ग्रामीण व विशेषतः आदिवासी क्षेत्रात प्रत्येक गावात स्थानिक आरोग्य कार्यकर्ती म्हणून "आशा" कार्यकर्तीची नेमणूक केली आहे. पाडा स्वयंसेवक जी कामे करीत आहेत त्यापैकी बहुतंःशी सर्व कामे "आशा" कार्यकर्तीकडून करण्यात येतात, म्हणून या शासन निर्णयाद्वारे आता पाडा स्वयंसेवकांची पदे मृत - संवर्ग (Dying Cadre) म्हणून घोषित करण्यात येत आहेत. या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यरत असलेल्या कोणत्याही पाडा स्वयंसेवकाला सेवेतून कमी करण्यात येऊ नये. तथापि सध्या अस्तित्वात असलेल्या पाडा स्वयंसेवक यांनी काम सोडल्यास किंवा त्यांचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांचे निवासी गावातून इतर ठिकाणी स्थलांतर झाल्यास किंवा इतर काही कारणांनी त्यांची पदे रिक्त झाल्यास त्यांच्या जागी यापुढे नवीन पाडा स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात येऊ नये.

२. या निर्णयाची अंमलबजावणी हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून करण्यात यावी.

३. <u>**आशा**</u> कार्यकर्तीने पाडा स्वयंसेवक जी कामे करीत आहेत, ती सर्व कामे करावीत याबाबत अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यांनी तात्काळ मार्गदर्शक सूचना तपासणी केल्यावर निर्गमित कराव्यात.

४. हा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून जर पाडा स्वयंसेवकांच्या रिक्त पदी नवीन पाडा स्वयंसेवकांची नियुक्ती केल्यास ते अधिकारी या प्रकरणी व्यक्तीशः जबाबदार राहतील आणि त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. म्हणून या निर्णयाची सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

५. पाडा स्वयंसेवक या पदांच्या रिक्त जागांविषयीचा वार्षिक अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी नियमित अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे या कार्यालयास पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(शोमीता बिस्वास)**
**सह सचिव**

प्रति,
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान, मुंबई
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे
उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळे (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा अधिकारी (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, (सर्व)
मा.मंत्री / राज्यमंत्री (आरोग्य) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
अपर मुख्य सचिव (आरोग्य) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव तथा आयुक्त (कुटुंब कल्याण) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग (अर्थ -९ / व्यय-१३) मंत्रालय, मुंबई
सह सचिव / उप सचिव (सर्व) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी (आरोग्य ५), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, कु.क.१.

---